प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय (ASI) | लोकसेवक राजेंद्र हरीभाउ देशमुख, वय ५१ वर्ष, व्यवसाय नोकरी, सहायक पोलीस उपनिरीक्षक ब.नं. १४२२ पोलीस स्टेशन जलंब, वर्ग ३ , रा. लक्ष्मीनगर वाडी खामगांव |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रूपये |
| घटनास्थळ | पोलीस स्टेशन जलंब समोरील अवचार यांचे हॉटेल |
| घटना तारीख | २९.०१.२०२१ |

थोडक्यात हकीकत :— गुन्हयाची हकीकत अश्या प्रकारे आहे की , तक्रारदार रामसिंग बादलसिंग राजपुत वय ४९ वर्ष व्यवसाय नोकरी, पोलीस नाईक ब.नं. ७५४ पो.मु. बुलडाणा, रा.खोलखेड ता.खामगांव जि. बुलडाणा यांचे पत्नीचे नावांवर असलेल्या ट्रॅक्टरवरील चालक व दोन कामगार यांचेवर दाखल असलेल्या गुन्हयात पीसीआर न घेता एमसीआर घेतल्याचे मोबदल्यात तसेच ट्रॅक्टर मालक या नात्याने फिर्यादीचे पत्नीला आरोपी न करणेसाठी पंच क्र. १ यांचे समक्ष १५,०००/— रूपये लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष १५,०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारुन लोकसेवक याने स्वत:चा अर्थिक फायदा करून घेवून लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केले

एकंदरीत आरोपी लोकसेवक राजेंद्र हरीभाउ देशमुख, वय ५१ वर्ष, व्यवसाय नोकरी, सहायक पोलीस उपनिरीक्षक ब.नं. १४२२ पोलीस स्टेशन जलंब , रा. लक्ष्मीनगर वाडी खामगांव यांनी त्यांचा आर्थीक लाभ करुन घेण्यासाठी तक्रारदार रामसिंग बादलसिंग राजपुत यांना १५,०००/— रूपये लाचेची मागणी करून ती पंचासमक्ष स्विकारुन लोकसेवक या पदाला न शोभणारे कृत्य केले आहे. यावरुन त्यांचे विरुध्द पो.स्टे. जलंब येथे अप.क्र. ११/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा, श्री. एस.एस.मेमाणे पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अकोला व सापळा पथकातील स्टाफ यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६६५७०६६७७ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

( संजय चौधरी )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner